गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ०७ वा ● शुक्रवार २४ मे २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 07 | Date : 24/05/2024 blow Thursday Page 4 Price 4

## मान्सून दक्षिण अरबी समुद्रात दाखल

नवी दिल्ली नैर्ऋत्य मौसमी पाऊस अर्थात मान्सून ३१ मे रोजी केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. अनुकूल वातावरणामुळे मान्सूनची आगेकूच वेगाने सुरूच आहे. दरम्यान, मान्सूनने आज दक्षिण अरबी समुद्राचा काही भाग, मालदीवचा आणखी काही भाग, कोमोरिन क्षेत्र, दक्षिण बंगालचा उपसागर, अंदमान आणि निकोबार बेटे आणि अंदमान समुद्राचा भाग व्यापला आहे. नैर्ऋत्येला लागून असलेल्या पश्चिम मध्य बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. ते ईशान्येकडे सरकेल आणि २४ तारखेपर्यंत बंगालच्या उपसागराच्या मध्यवर्ती भागांवर तीव्र कमी दाबाचे क्षेत्र (डिप्रेशन) तयार होईल. ते ईशान्येकडे पुढे सरकेल आणि त्यानंतर ते



आणखी तीव्र होईल, असे हवामान विभागाने म्हटले आहे. या आठवड्यात दक्षिणेकडील राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे. केरळला रेड अलर्ट जारी केला असून दक्षिणेकडील राज्यांमध्ये २५ मेपर्यंत मुसळधार पावसाची शक्यता आहे. । पान २ वर

## दहावीचा निकाल २७ मेपर्यंत

पुणे : दहावीचा निकाल २७ मेपर्यंत लागू शकेल, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली. केसरकर यांनी पत्रकार परिषद घेत बारावीच्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी त्यांनी दहावीचा निकाल कधी लागणार याबाबत माहिती दिली. बारावीच्या निकालात कोकण विभागाने बाजी मारल्याने आनंद आहे. कोकणात सिंधुदुर्ग जिल्हा एक नंबरला आहे. बारावीचा निकाल यावेळी आठ दिवस अगोदर जाहीर झाला आहे. दोन दिवसांपूर्वीच निकाल जाहीर होणार होता. मात्र, राज्यात पाचव्या टप्प्याचे मतदान होणे बाकी होते. त्यामुळे राज्यातील मतदान पार पडल्यानंतर निकाल जाहीर करण्यात आला, असे केसरकर म्हणाले.

## सहाव्या टप्प्याचा प्रचार थंडावला; हा राज्यांतील ५८ जागांवर उद्या मतदान

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा निवडणुकीतील सहाव्या टप्प्याचा प्रचार गुरुवारी समाप्त झाला. सहा राज्ये तसेच दोन केंद्रशासित प्रदेशांतील ५८ जागांवर उद्या, शनिवारी मतदान होत आहे. दिल्लीतील सर्व सात जागा, हरियाणातील सर्व १० जागा आणि उत्तर प्रदेशातील १४ जागांचा यामध्ये समावेश आहे. जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग-राजौरी मतदारसंघातही मतदान होणार आहे.

**ओडिशात विधानसभेसाठी मतदान**

**ओडिशामध्ये शनिवारी लोकसभा निवडणुकांबरोबरच विधानसभेच्या निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यांत ४२ मतदारसंघांसाठी मतदान होणार आहे.**

* धमेंद्र प्रधान, संबलपूर, ओडिशा (भाजप)
* मनोज तिवारी, ईशान्य दिल्ली (भाजप)
* कन्हैया कुमार, ईशान्य दिल्ली (काँग्रेस)
* मनेका गांधी, सुलतानपूर (भाजप)
* मेहबुबा मुफ्ती, अनंतनाग-राजौरी (पीडीपी)
* मनोहरलाल खट्टर, कर्नाल (भाजप)
* नवीन जिंदाल, कुरुक्षेत्र (भाजप)

सहाव्या टप्प्यात एकूण ८८९ उमेदवार रिंगणात आहेत. या टप्प्यातील काही महत्त्वाच्या जागांमध्ये नवी दिल्ली, ईशान्य दिल्ली, वायव्य दिल्ली व राष्ट्रीय राजधानीतील चांदनी चौक तसेच उत्तर प्रदेशातील सुलतानपूर आणि आझमगड यांचा समावेश आहे. जम्मू आणि काश्मीरचे अनंतनाग-राजौरी, पश्र्चिम बंगालचे तमलूक, मेदिनीपूर, हरियाणाचे कर्नाल, कुरुक्षेत्र, गुडगाव, रोहतक आणि ओडिशाचे भुवनेश्र्वर, पुरी आणि संबलपूर या इतर महत्त्वाच्या जागा आहेत. निवडणुकीच्या या टप्प्यात भाजप तसेच काँग्रेस, आम आदमी पक्ष आणि इंडिया आघाडीतील इतर घटक पक्षांनी दावे केले आहेत. दिल्लीच्या मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना प्रचारासाठी अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला.



## सोलापूर जिल्हा परिषदेतून एकाच दिवशी होणार २५० कर्मचारी निवृत्त

सोलापूर/प्रतिनिधी : जिल्ह्याचे मिनी मंत्रालय समजल्या जाणा-या सोलापूर जिल्हा परिषदेच्या सेवेतून येत्या ३१ मे रोजी सुमारे २५० कर्मचारी निवृत्त होत आहेत. त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी संबंधित कर्मचा-यांना सेवानिवृत्तीचे लाभ देण्यासाठी सुट्टीतही विशेष शिबीर आयोजिले आहे. जि. प. च्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे यांच्या मदतीने आयोजिलेल्या या विशेष शिबिरात निवृत्त कर्मचा-यांना सेवानिवृत्तीचे लाभ वेळेत मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली जाणार आहे.

जुन्या काळात अधिकृत जन्मदाखला नसलेल्या मुलांना शाळेत दाखल करताना तेथील शिक्षकांकडून शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवसाची १ जून हीच तारीख मुलांच्या जन्म तारीख म्हणून नोंद केली जात असे. गुरूजींनी नोंद केलेली विद्यार्थ्यांची १ जून ही जन्मतारीख अद्यापपर्यंत चालत आली आहे. हीच जन्मतारीख घेऊन शासकीय-निमशासकीय सेवेत कार्यरत असलेले असे अनेक अधिकारी व कर्मचारी ३१ मे रोजी सेवानिवृत्त होतात. जिल्हा परिषदेत ३१ मे रोजी एकाच दिवशी असे विविध विभागातील सुमारे अडीचशे कर्मचारी निवृत्त होत आहेत. या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्याच दिवशी त्यांच्या सेवेचे सर्व लाभ द्यावेत, अशा सूचना दिलेल्या आहेत.। पान २ वर

## डोंबिवलीतील अतिधोकादायक कंपन्या तात्काळ बंद करणार; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती

**डोंबिवली/दैनिक यशसिध्दि न्यूज** मानवी जीविताला हानीकारक ठरणाऱ्या डोंबिवली एमआयडीसीतील अतिधोकादायक कंपन्या तात्काळ बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या अतिधोकादायक कंपन्यांना पर्याय म्हणून त्यांनी आपल्या कंपनी उत्पादन प्रक्रियेत अभियांत्रिकी, कापड किंवा अन्य बदल करून ते आहे त्या जागेत चालू ठेवावेत. असे बदल ज्यांना करायचे नसतील त्यांनी शहरा बाहेर शासनाने भूसंपादित केलेल्या जागेत स्थलांतरित व्हावे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डोंबिवली एमआयडीसीतील जळीत अमुदान कंपनीला गुरुवारी रात्री भेट दिल्यानंतर माध्यमांशी बोलताना दिली.

रिक्टरचा स्फोट होऊन दुर्घटना घडल्याची प्राथमिक माहिती आहे. या स्फोटात आठ कामगारांचा मृत्यू, ६५ कामगार जखमी झाले आहेत. या स्फोटाची झळ लगतच्या सहा कंपन्यांना बसली आहे.

या कंपन्यांमध्ये काही कामगार अडकून पडले आहेत. त्यांच्या बचावाचे काम आपत्कालीन पथकांनी हाती घेतले आहे. पूर्वाश्रमीची अंबर केमिकल म्हणून ओळखली जाणारी ही कंपनी आता अमुदान केमिकल म्हणून ओळखली जाते. या कंपनीत यापूर्वीही स्फोट झाले होते, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.



राज्यातील एमआयडीसींमधील कंपन्यांची आता अ, ब आणि क अशी वर्गवारी करण्याच्या सूचना प्रदूषण नियंत्रण, औद्योगिक, औद्योगिक सुरक्षा, कामगार विभाग यांना दिल्या आहेत. या वर्गवारीप्रमाणे त्या भागात त्या कंपन्या ठेवायच्या की नाही हा लोकांच्या जीविताचा विचार करून निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले. डोंबिवली एमआयडीसीतील मानवी जीविताला हानीकारक अतिधोकादायक कंपन्या तात्काळ बंद केल्या जात आहेत. ज्या कंपन्यांना अतिधोकादायक कंपनीत माहिती तंत्रज्ञान, कापड, अभियांत्रिकी विषय उत्पादन प्रक्रिया सुरू करायच्या आहेत ते असे फेरबदल करून आपले उद्योग सुरू ठेऊ शकतात. पण ज्यांना आपल्या कंपनीत बदल करायचे नाहीत ते उद्योग शहराबाहेर शासनाने उद्योगांसाठी भूसंपादित केलेल्या जागेत स्थलांतरित केले जातील, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## मते ३२-३३ टक्क्यापर्यंत घसरली तर भाजप सत्तेतून बाजूला : जयंत पाटील

सांगली : भाजपा २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ३७ टक्के मते घेऊन देशाच्या सत्तेत आले होते. मात्र या निवडणुकीत ते ३२-३३ टक्क्यां पर्यंत खाली आल्यास,ते देशातील सत्तेतून जाऊ शकतात असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष, माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांनी इस्लामपूर येथे केले. हातकणंगले मतदार संघातून महाविकास आघाडीचे सत्यजित पाटील हे चांगल्या मताधिक्क्याने विजयी होतील असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.



इस्लामपूर येथे महाविकास आघाडीचे उमेदवार सत्यजित पाटील यांच्या आभार सभेत बुधवारी ते बोलत होते. याप्रसंगी महाविकास आघाडीचे उमेदवार माजी आ.सत्यजित पाटील,सांगली जिल्हा बँकेचे अध्यक्ष आ.मानसिंगराव नाईक, युवा नेते प्रतिक पाटील, युवक राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष विराज नाईक आदींसह महाविकास आघाडीतील घटक पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

आ.पाटील पुढे म्हणाले, सांगली मतदारसंघात माझ्या नावाने खडे फोडतात. मात्र सध्याचे अपक्ष उमेदवार आहेत,त्यांच्या नावाची मी शिफारस केली होती. मात्र शिवसेनेच्या कोल्हापूर, हातकणंगले या जागा छ.शाहू महाराज व राजू शेट्टी यांना । पान २ वर

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची डाळिंब संशोधन केंद्रास भेट.....

## जिल्ह्यातील डाळिंब फळ पिकाच्या क्षेत्रात भरीव वाढ करण्यासाठी नव तंत्रज्ञानाचा वापर करणार : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**✻ सोलापूर जिल्ह्याला डाळिंब फळ पिकाच्या उत्पादनात पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याचे आवाहन ✻ बीबीदारफळ येथील डाळिंब फळ पिकाच्या एक खोड लागवड पद्धत तर पाकणी येथील परंपरागत लागवड पद्धतीच्या प्लॉट ला भेट ✻कृषी विभागाच्या स्मार्ट योजनेअंतर्गत जिल्ह्यात शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करणार**

सोलापूर/प्रतिनिधीः डाळिंबाचा जिल्हा म्हणून सोलापूर जिल्ह्याची एक विशेष ओळख आहे. परंतु मागील काही वर्षापासून डाळिंब फळ पिकावर पडणारे विविध रोग व त्यातून डाळिंबाचे कमी दर्जाचे पीक आल्याने न मिळणारा भाव यामुळे सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी डाळिंब फळ पिकापासून दूर जात असल्याचे चित्र आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी व येथील शेतकरी पुन्हा डाळिंब पिकाकडे आकर्षित होऊन सोलापूर जिल्ह्याला डाळिंब फळ पिकात पूर्वीचे गतवैभव प्राप्त व्हावे यासाठी डाळिंब उत्पादनात



नव तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीपणे करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र येथे भेट देऊन येथील डाळिंब फळ पिकावर व त्यातील नव तंत्रज्ञानावर संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांशी त्यांनी चर्चा केली. यावेळी राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ श्री. मराठे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, आत्माचे प्रकल्प संचालक मदन मुकणे यांच्यासह अन्य शास्त्रज्ञ उपस्थित होते. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे सोलापूर जिल्ह्यातील डाळिंब फळ पिकाच्या क्षेत्रात भरघोस वाढ करणे तसेच येथील शेतकऱ्यांना डाळिंब फळ पिकातून मोठ्या प्रमाणात आर्थिक समृद्धी मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्याच अनुषंगाने सोलापूर येथील राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्रास भेट देऊन येथील शास्त्रज्ञ यांच्याशी त्यांनी चर्चा केली. डाळिंब फळ पिकावर पडणाऱ्या विविध रोगावर प्रतिकार करण्यासाठी दर्जेदार डाळिंब पिकाचे वाण तसेच विविध प्रतिबंधात्मक औषधी तसेच या पिकाच्या उत्पादनासाठी नव । पान २ वर

## यंदा केंद्र सरकारकडून विक्रमी गहू खरेदी

नवी दिल्ली : सध्या सरकारकडून मोठ्या प्रमाणात गव्हाची खरेदी सुरू आहे. मागील वर्षीचा गहू खरेदीचा विक्रम मोडण्याची शक्यता आहे. सध्या गव्हाची खरेदी २६१ लाख टनांच्या जवळपास आहे. ही खरेदी २७० लाख टनांपर्यंत पोहोचेल असा विश्वास एफसीआयच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. सध्या २६०.८ लाख मेट्रिक टन गव्हाची खरेदी झाली. त्यामुळे सरकार यावर्षी मागील वर्षीच्या गहू खरेदीचा विक्रम मोडण्याची शक्यता दाट आहे. कारण अद्यापही अनेक राज्यांमध्ये सरकारकडून गव्हाची खरेदी सुरू आहे. मध्य प्रदेशने गहू खरेदीचा कालावधी हा ३१ मेपर्यंत वाढवला आहे. पंजाब आणि हरियाणामध्ये आतापर्यंत जास्त गव्हाची खरेदी केली आहे. उत्तर प्रदेशातही गहू खरेदीला मोठ्या प्रमाणात चालना देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पंजाबमध्ये १२४ लाख टन तर हरियाणामध्ये ७१.४ लाख टन गव्हाची खरेदी झाली आहे. एकूण गव्हाची खरेदी ही २७० लाख टनांपर्यंत पोहोचेल असा अंदाज आहे.

## संपादकीय

### अशा लोकांची सुटका नकोच..

शहराचे वाढलेले औद्योगिकीकरण, नोकरी व उद्योगाच्या निमित्ताने अन्य भागातून पुण्याकडे येत असलेले नागरिकांचे लोंढे, रोजगाराच्या संधीतून हाती खुळखुळत असलेला पैसा आणि त्या पैशाची रेस्टॉरंट, बार व पबमध्ये होत असलेली उधळपट्टी यामुळे या विद्येच्या शहराची विकृतीकडे वाटचाल होताना दिसते. बड्या बापाची मुले पैशाच्या मस्तीमुळे समाजाच्या मुळावर उठली आहेत. पुण्यातील कल्याणीनगर भागामध्ये बिल्डर विशाल अग्रवाल याच्या अल्पवयीन मुलाने दारूच्या नशेत दोन कोटींची कार भरधाव वेगाने चालवून दोघांना चिरडल्याची घटना अत्यंत संतापजनक आणि तितकीच चीड निर्माण करणारी आहे. बिल्डरपुत्राच्या मस्तवालपणामुळे दोन निष्पाप तरुणांचा मृत्यू झाला. हवेत चेंडू उडावा त्या पध्दतीने त्याने त्या दोघांना चिरडून मारले, असेच म्हणावे लागेल. ज्या पबमध्ये त्या मुलाने दारू ढोसली त्या पबच्या मालकालाही पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अल्पवयीन मुलाच्या हाती गाडी देऊन अपघातास कारणीभूत ठरल्याबद्दल पोलिसांनी विशाल अग्रवाल याच्याही मुसक्या आवळल्या आहेत. परंतु घटना घडल्यानंतर त्या मुजोर मुलास अद्दल घडविण्याऐवजी त्याच्या मदतीस जे धावले ते समाजाचे गुन्हेगारच आहेत. अजित पवार गटाचे आमदार सुनील टिंगरे यांनी पोलिसांवर दबाव आणून त्या अल्पवयीन मुलावर सौम्य कलम लावण्यास भाग पाडले, असा आरोप केला जात आहे. वास्तविक पाहता अपघातामध्ये मृत्यू पावलेल्या त्या दोन तरुणांच्या नातेवाइकांच्या मदतीला धावण्याऐवजी गुन्हेगारांना साथ देणारे तितकेच दोषी असतात. पोलिसांनी ताब्यात घेऊन त्या अल्पवयीन मुलाला बालगुन्हेगार न्याय मंडळासमोर हजर केले. तेव्हा त्याला तत्काळ जामिनावर सोडण्यात आले. मात्र, न्यायमंडळाने जामिनासाठी जी अट घातली त्यातून बळी पडलेल्या त्या दोघांच्या नातेवाइकांची थट्टा केल्यासारखी आहे. त्या बेवड्या बाल गुन्हेगाराने पंधरा दिवस वाहतूक पोलिसांसमवेत वाहतुकीचे नियमन करावे. भविष्यात अपघात झाल्याचे दिसल्यास त्याने जखमींना मदत करावी आणि मानसोपचार तज्ज्ञांकडून त्याला उपचार करून घ्यावे लागतील असे न्यायालयाने सुचविले आहे. अशा सौम्य शिक्षेमुळे बड्या श्रीमंतांच्या मस्तवाल मुलांना चाप कसा बसेल? केंद्रीय मोटार वाहन कायद्यात अलीकडेच सुधारणा करण्यात आली आहे. त्यामध्ये अपघातात एखाद्याचा मृत्यू झाला तर त्या वाहन चालकास जबर शिक्षा आणि दंडाची तरतूद केली आहे. मात्र, वाहन चालक-मालक संघटनेच्या विरोधानंतर त्याला केंद्र सरकारने स्थगिती दिली आहे. परंतु, त्या स्थगितीतून अशा लोकांची सुटका होऊ नये.

# महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात अनधिकृत व बेढब विकास कामे करुन विकास आराखडा हाणून पाडण्याचे प्रकार करणाऱ्यावर फौजदारी कार्यवाही करा : विभागीय आयुक्तांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**छत्रपती संभाजीनगर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महानगर प्रदेश विकास क्षेत्रात अनधिकृत व बेढब विकास कामे करुन मंजूर विकास आराखडा हाणून पाडण्याचे प्रकार होत आहेत. यामध्ये सामील शासनाच्या विविध विभागाचे अधिकारी, विभागीय कार्यवाहीस व दिलेल्या सूचनेस जुमानत नाहीत, असे स्पष्ट होत असल्याने अशा प्रकारात सामील विकासक व त्यांना मदत करणारे सर्व संबंधित विभागाचे अधिकारी यांच्यावर फौजदारी कार्यवाही होणे गरजेचे वाटते व त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ व इतर अनुषंगिक कायद्याखाली उपविभागीय अधिकारी (महसूल) यांना प्राधिकृत करुन अशी प्रकरणे तपासून, फौजदारी कार्यवाही करण्याचे आदेशित करावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास वेळोवेळी सादर करावा, असे पत्र विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांनी छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

विकास आराखड्यामध्ये बनावट झोन दाखल्या आधारे निर्गमीत करण्यात येत असलेल्या अकृषिक परवानग्यांबाबत नगररचना विभागातील अधिकारी तसेच कर्मचारी यांनी सदर बाबीस आळा बसण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, प्राप्त प्रकरणांची चौकशी करणे व संबंधितांवर गुन्हे दाखल करणे इत्यादी प्रकारची कार्यवाही करणे अपेक्षित असतानाही अधिकारी तसेच कर्मचारी स्वतःहून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करीत नसल्याने मंजूर आराखड्यात अनुचित फेरबदल होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे विकास आराखड्याचा मूळ उद्देश साध्य होत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे संबंधितांवर उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव नगररचना विभागाचे संचालक अविनाश पाटील यांच्याकडे पाठविण्यात आला मात्र संबंधितांकडून अद्याप कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही, असेही विभागीय आयुक्त श्री. अर्दड पत्रात म्हटले आहे.

महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ चे कलम २ (ब) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने छत्रपती संभाजीनगर शहरा भोवतालचे काही क्षेत्र विशेष करुन औरंगाबाद महानगर औरंगाबाद म्हणून घोषित करण्यात आले आहे. अनुसूचित नमूद केलेल्या क्षेत्राचा उचित व सुव्यवस्थित विकास होण्यासाठी औरंगाबाद महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष प्राधिकरण म्हणून स्थापना करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत विकास परवानगी ही एकच शाखा कार्यरत असून, अन्य शाखांकरिता शासनाकडून अधिकारी तसेच कर्मचारी यांची अद्याप नियुक्ती करण्यात आलेली नाही. प्राधिकारणाचे कामकाम हाताळण्यासाठी पुरेशी यंत्रणा नसल्याने, प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील क्षेत्रामध्ये अनधिकृत बांधकामे होऊ नये यासाठी तात्पुरत्या स्वरुपात संबंधित तहसिलदार यांना नियंत्रक म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार नियंत्रक, अनधिकृत बांधकाम यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील आवश्यक अधिकारी तसेच कर्मचारी यांची नियुक्ती करुन, कार्यक्षेत्रात अनधिकृत होत असलेली बांधकामे तसेच अनधिकृत विकासकावर कायदेशीर कार्यवाही करणे अपेक्षित असल्याचे विभागीय आयुक्त श्री अर्दड यांनी पत्रात म्हटले आहे.

प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील छत्रपती संभाजीनगर, खुलताबाद, गंगापूर, वैजापूर व पैठण या तालुक्यातील एकूण ३१३ गावांचा समावेश करण्यात आला आहे. प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात प्रत्यक्ष १५ ऑगस्ट २०१९ पासून विकास परवानगी, अनधिकृत बांधकाम प्रतिबंध व निर्मूलन इत्यादी कामकाज सुरू आहे. त्या अनुषंगाने

*** केवळ छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयाने मंजूर केलेल्या रेखांकनातील भूखंडांचीच खरेदी-विक्री दस्त नोंदणी संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयाने करावी.**

*** नियमितीकरण न झालेल्या गुंठेवारी भूखंडांची कोणत्याही परिस्थितीत खरेदी-विक्री दस्त नोंदणी करु नये.**

*** दस्त नोंदणी करताना शेतजमीन तुकडेबंदी कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.**

*** मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी यासंबंधी तपासणी करावी व नियमित आढावा घ्यावा.**

*** मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी प्राधिकरण कार्यक्षेत्रातील १५ ऑगस्ट २०१९ पासून भुखंडाचे नोंदणीकृत दस्ताऐवजांची कायदेशिर सत्यता तपासावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल नोंदणीकृत दस्ताऐवजांच्या प्रतीसह सादर करावा.**

*** नियोजन प्राधिकरणाने विकास परवानगी दिलेली नसताना देखील कोणत्या तरतुदीच्या आधारे अकृषक आदेश तसेच सनद निर्गमित करण्यात येतात? याबाबतची माहिती संबंधित तहसिलदारांनी सादर करावी.**

*** परस्पर बोगस अकृषक सनद तसेच आदेश बनवणाऱ्या विरुद्ध तसेच बनावट कागदपत्रे सादर करुन अकृषक आदेश प्राप्त करणाऱ्यांविरुद्ध कोणती कायदेशीर कार्यवाही केली जाते? याबाबतची माहिती संबंधित तहसिलदारांनी सादर करावी.**

*** यापुर्वी बोगस अकृषक आदेशाबाबत जी माहिती या कार्यालयाने तहसिल कार्यालयाकडून मागितली होती ती फक्त अपर तहसिलदार छत्रपती संभाजीनगर यांनी अर्धवट सादर केली. उर्वरीत संबंधित तहसिलदारांनी परीपुर्ण माहिती तात्काळ सादर करावी.**

*** अकृषक सनद निर्गमित करतांना संचिकेसोबत सादर करण्यात आलेल्या दस्तऐवजांची सत्यता पडताळणी करावी व दस्तऐवजांचे प्रमाणिकरण झाल्यानंतरच अकृषक आदेश/सनद निर्गमित करावेत.**

*** तहसीलदार यांनी नियोजन प्राधिकरणाने दिलेल्या विकास परवानगीतील नमूद मंजूर प्रयोजनासाठी अकृषक सनद/आदेश निर्गमित करावेत. केवळ झोन दाखल्याच्या आधारे तहसील कार्यालयाने कोणतीही अकृषक सनद निर्गमित करू नये.**

*** निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपरोक्त सर्व बाबींची तपासणी करून नियमित आढावा घ्यावा व त्याबाबतचा अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावा.**

*** २४ फेब्रुवारी २०२० रोजीच्या आदेशान्वये संबंधित तहसिलदार यांना प्राधिकरण क्षेत्रातील नियंत्रक, अनाधिकृत बांधकाम म्हणून प्राधिकृत केलेले आहे. त्यानुसार तहसिलदार यांनी त्यांच्या हद्दीतील अनाधिकृत बांधकामाचा आढावा घ्यावा व प्राप्त /प्रदान अधिकारान्वये अनाधिकृत बांधकामावर कार्यवाही करावी.**

*** तहसिलदार यांनी स्वत: च्या कार्यक्षेत्रात सर्वेक्षण करुन अनधिकृत विकास/ बांधकाम करणाऱ्या बांधकाम धारकास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ व ५४ अन्वये विहित मुदतीची नोटीस देण्याची कार्यवाही करावी.**

*** विना परवानगी बांधकाम करत असलेल्या बांधकाम धारकांचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ अन्वये काम थांबवणे व त्यांना नियमानुसार संबंधित नियोजन प्राधिकरणाकडून परवानगी घेण्याबाबत सूचना द्याव्यात.**

*** उक्त प्रमाणे बजावलेल्या नोटीसीनुसार मुदतीत अंमल न केलेल्या बांधकामधारकांचे अनधिकृत बांधकामे निष्कासित करावे.**

*** अनधिकृत बांधकाम निष्कासित न केल्यास संबंधित बांधकाम धारका विरुद्ध महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ व ५४ अन्वये पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे नोंद करण्याची कार्यवाही करावी.**

*** तहसीलदार यांनी यासंबंधी नियमितपणे कार्यवाही करुन विहित नमुन्यात मासिक अहवाल सादर करावा.**

कामकाजाबाबत क्षेत्रिय स्तरावरुन महसूल विभाग, नगरविकास विभाग, नोंदणी व मुद्रांक विभाग यांच्या कामकाजातील अनियमिततेबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रत्यक्ष स्थळपाहणी व अभिलेख तपासणी केली असता चिन्हांकन केलेले नसणे, जलनिःसरणाची व्यवस्था नसणे, रस्ते नाहीत व पथदिवे नाहीत, खुल्या जागेबाबत नियमावलीचे पालन केल्याचे दिसून येत नाही. अंतिम परवानगी दिलेली असताना, जायमोक्यावर वाटसरु व प्रवासी व्यक्ती पाल ठोकून थांबलेले आढळून आल्याची निरीक्षणे देखील विभागीय आयुक्त श्री अर्दड यांनी पत्रात नमूद केल्या आहेत.

प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील या प्रकाराच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून विसंगती आढळून येत असलेल्या प्रकरणांच्या अनुषंगाने उपायुक्त (विकास-आस्थापना) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापना करुन, युडीसीआर व एमआरटीपी तरतुदीखाली सखोल चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

लेखी, मौखिक व बैठकीद्वारे वारंवार सूचना देण्यात येऊनही संबंधित नगररचना विभाग, महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, दुय्यम निबंधक, नोंदणी विभाग, मुद्रांक जिल्हाधिकारी, सहजिल्हा निबंधक यांना विषयाची जाणीव झालेली असताना व संबंधित तहसिलदार कदाचित महसूल व निवडणुकीच्या कामामुळे कोणीही अजिबात लक्ष दिलेले नाही. या अधिकाऱ्यांच्या कामकाजांमध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा अथवा प्रगती झाली नसल्याने, महानगर प्रदेश विकास आराखड्याचे अभंगत्व धोक्यात आल्याचा उल्लेख विभागीय आयुक्त श्री अर्दड यांनी पत्रात केला आहे.

महानगर प्रदेश विकास क्षेत्रात शासनास खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक व नियोजनात्मक हानी पोहचण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे अनधिकृत व बेढब विकास कामे करुन, शासन मंजूर विकास आराखडा हाणून पाडण्याचे प्रकार आजही होत आहेत. यामध्ये सामील शासनाचे विविध विभागाचे अधिकारी, विभागीय कार्यवाहीस व दिलेल्या सूचनेस जुमानत नाहीत, असे स्पष्ट होत असल्याने अशा प्रकारात सामील विकासक व त्यांना मदत करणारे सर्व संबंधित विभागाचे अधिकारी यांच्यावर फौजदारी कार्यवाही होणे गरजेचे वाटते व त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ व इतर अनुषंगिक कायद्याखाली उपविभागीय अधिकारी (महसूल) यांना प्राधिकृत करुन, अशी प्रकरणे तपासून, फौजदारी कार्यवाही करण्याचे आदेशित करावे व उपरोक्तप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास वेळोवेळी सादर करण्याबाबतही विभागीय आयुक्त श्री अर्दड यांनी पत्रात म्हटले आहे.

१५ ऑगस्ट २०१९ पासून खरेदी-विक्री व्यवहाराच्या प्रती उपलब्ध करून देण्याबाबत दुय्यम निबंधक यांना सूचना दिलेल्या असतानाही, सदर प्रति उपलब्ध न झाल्याने यामध्ये काही गडबड झाली असल्याचा संशय बळावत असल्याचेही विभागीय आयुक्त श्री अर्दड यांनी म्हटले आहे.

प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील अकृषिक परवानगी व त्या अनुषंगाने होत असलेल्या कामकाजासंबंधाने महानगर नियोजनकार, निवासी उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर, संबंधित तहसिलदार व संबंधित दुय्यम निबंधक यांची संयुक्त आढावा बैठक घेत देण्यात आलेले निर्देश

पान १ वरुन

## मते ३२-३३ टक्क्यापर्यंत घसरली

देणार असल्याने त्यांनी त्यांचा उमेदवार जाहीर केला. राज्यातील ४८ जागा मध्ये भाजपास १२ ते १५ पेक्षा जादा जागा मिळणार नाहीत असे आजचे चित्र आहे. आता विधानसभेची निवडणूक आहे. ताकदीने कामाला लागा. मतदार याद्यावर लक्ष ठेवा,बुथच्या कामास अधिक गतिमान करा. मी मतदार संघाचा संपर्क दौरा करणार आहे. यावेळी आ. नाईक, सत्यजित पाटील, उबाठा शिवसेनचे अभिजित पाटील, शकील सय्यद, काँग्रेस पक्षाचे संदीप जाधव, कॉ.धनाजी गुरव, महिला राष्ट्रवादीच्या सुस्मिता जाधव, सुनिता देशमाने, बी.के. पाटील, संग्राम फडतरे, देवराज देशमुख, पुष्पलता खरात आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

## जिल्ह्यातील डाळिंब फळ पिकाच्या..

तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि शेतकऱ्यांना याविषयी प्रशिक्षित करण्यासाठी डाळिंब संशोधन केंद्राची कशा पद्धतीने मदत होईल याविषयी त्यांनी माहिती जाणून घेतली.

कृषी विभाग व आत्मा यांच्या समन्वयातून जिल्ह्यातील डाळिंब पिकवणाऱ्या शेतकऱ्यांची संवाद साधण्यात येणार असून डाळिंब फळ पिकाच्या क्षेत्रात वाढ करण्यासाठी योग्य नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. बीबीदारफळ येथील डाळिंब उत्पादक शेतकरी श्री. संतोष निळ यांच्या डाळिंब पिकाच्या प्लॉटला जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी भेट दिली. शेतकरी संतोष निळे यांनी डाळिंब पिकाच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी नवीन लागवड पद्धतीचा वापर केलेला आहे. ही पद्धत म्हणजे एक खोड लागवड पद्धत होय.

ही पद्धत बैरागवाडी तालुका माढा येथील शेतकरी प्रवीण माने यांनी विकसित केलेली आहे. या एक खोड लागवड पद्धतीमुळे डाळिंब फळ पिकाच्या उत्पादनात भरघोस वाढ मिळते अशी माहिती श्री.माने यांनी यावेळी दिली.

पाकणी येथील डाळिंब पिकवणारे शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी डाळिंब फळ पिकाच्या परंपरागत लागवड पद्धतीची माहिती जाणून घेतली. यावेळी त्यांनी संबंधित शेतकऱ्यांची डाळिंब फळ पिकाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करून जिल्ह्यातील डाळिंब फळ पिकाचे क्षेत्र वाढवणे यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी कृषी विभाग प्रयत्न करेल, प्रशासनाच्या वतीने योग्य नियोजन करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

*भूसेवा शेतकरी उत्पादक कंपनी: मोहोळ तालुक्यातील हिवरे येथील भूसेवा शेतकरी उत्पादक कंपनीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भेट देऊन या कंपनीच्या कामकाजाची माहिती घेतली तसेच कंपनीला पुढील काळात कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण झाल्यास ती सोडवण्यासाठी प्रशासन सदैव तत्पर राहील, अशी ग्वाही यावेळी त्यांनी दिली. यावेळी कंपनी जवारीचे क्लिनिंग, ग्रेडिंग, ब्रॅण्डिंग, पॅकेजिंग आणि मार्केटिंग कशा पद्धतीने करत आहे याविषयीची माहिती त्यांनी जाणून घेतली. कृषी विभागाच्या स्मार्ट योजनेअंतर्गत आणखी शेतकरी उत्पादक कंपन्या जिल्ह्यात कशा पद्धतीने स्थापन करता येतील याविषयी कृषी विभाग व आत्मा ने नियोजन करावे असेही त्यांनी सूचित केले.

ही भूसेवा शेतकरी उत्पादक कंपनी ज्वारी उत्पादनात अग्रेसर असून या कंपनीचा न्यूट्री सोर्घ हा ब्रँड महाराष्ट्रात प्रसिद्ध झालेला आहे, अशी माहिती कंपनीचे प्रमुख सचिन थिटे यांनी दिली. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, प्रकल्प संचालक आत्मा मदन मुकणे, तालुका कृषी अधिकारी अतुल पवार व कृषी विभागातील सर्व अधिकारी तसेच भुसेवा शेतकरी उत्पादक कंपनीचे सर्व संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

## सोलापूर जिल्हा परिषदेतून

त्यानुसार प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी वित्त विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन ३१ मे रोजी सेवानिवृत्त होणा-या अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्याच दिवशी भविष्य निर्वाह निधी, ग्रच्युईटीसह निवृत्तिवेतनाचा लाभ मिळवून देण्याची तयारी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे वित्त विभागाच्या मुख्य लेखा अधिकारी मीनाक्षी वाकडे यांनी सुट्टीच्या काळात निवृत्त कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी व पेन्शनचा लाभ देण्यासाठी विशेष शिबीर आयोजिले आहे. या माध्यमातून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना असा सुखद धक्का दिला आहे. दरवर्षी असे अनेक कर्मचारी सेवानिवृत्त होतात पण नंतर त्यांना निवृत्तिवेतनासह अन्य कायदेशीर लाभासाठी हेलपाटे घालावे लागतात. ही समस्या ओळखून मुख्य कार्यकारी अधिकारी आव्हाळे यांनी हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

## मान्सून दक्षिण ..

तमिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल भागांमध्ये २४ मेपर्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे. २३ मे रोजी कर्नाटकची किनारपट्टी आणि अंतर्गत काही भागांमध्येही अशीच हवामानाची परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा आणि अरुणाचल प्रदेश या ईशान्येकडील राज्यांमध्ये २६ मे रोजी मुसळधारचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# कार्ला बौद्ध लेणी येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त हजारोंच्या उपस्थितीत महाबुद्धवंदना संपन्न



**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज** : सालाबादप्रमाणे गुरुवार दिनांक २३ मे २०२४ रोजी २५६८ व्या बुद्ध पौर्णिमेनिमित्त कार्ला बौद्ध लेणी, मावळ, पुणे येथे आदरणीय भिक्खू संघाच्या उपस्थितीत महाबुद्धवंदनेचे आयोजन ढहश ईीववहळीीं िलळर्शीं ेष खपवळर तथा भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने करण्यात आले. सदर कार्यक्रमात आदरणीय भंते धम्मानंद यांच्यासह ४० श्रामनेर, हजारो उपासक – उपासिका व स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते. याप्रसंगी सकाळी १० वाजता महाबुद्धवंदना व सुत्तपठण घेण्यात आले त्यानंतर आदरणीय भंते धम्मानंद यांनी उपस्थित उपासकांना धम्मदेसना देत भगवान गौतम बुद्ध यांच्या विश्र्वशांतीचा मार्ग सांगितला. तसेच अहिंसा, मैत्री-भाव, पंचशील, अष्टांग मार्ग यांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन केले. त्यानंतर महाराष्ट्रातील सर्व लेणी संवर्धन संघटना यांच्यातर्फे भिक्खू संघास व उपासकांना भोजनदान करण्यात आले.कार्ला बौद्ध लेणी लोणावळ्याजवळ वेहेरगाव येथे बौद्ध भिक्खुसाठी इ.स. पूर्व पहिल्या शतकात कोरण्यात आली. कार्ला लेणीमध्ये जम्बुव्दिपातील सर्वात मोठे चैत्यगृह व स्तूप कोरण्यात आलेला आहे. कार्ला लेणी थेरवाद व महायान या दोन्हीही प्रमुख बौद्ध शाखेच्या एकीचे प्रतीक मानले जाते. या लेणीतील भगवान बुद्ध, बोधिसत्व, हत्ती, पिंपळाकृती कमानी, बौद्ध राजे-राण्या, मोठे स्तंभ अशी सुबक व कोरीव शिल्पे कलेची साक्ष देतात.

# राज्यपाल रमेश बैस यांनी घेतले श्री क्षेत्र महाबळेश्वरचे दर्शन



सातारा/दैनिक यशसिध्दि न्यूज : राज्यपाल रमेश बैस यांनी आज सहकुटुंब श्री क्षेत्र महाबळेश्र्वरचे दर्शन घेतले. यावेळी तहसीलदार तेजस्विनी पाटील, क्षेत्र महाबळेश्र्वरचे सरपंच सुनिल बीरामने आदी उपस्थित होते. यावेळी राज्यपाल श्री. बैस यांनी पंचगंगा मंदिर दर्शन घेऊन कृष्णा, वेण्णा, कोयना, सावित्री व गायत्री नदीच्या उगमस्थानास भेट दिली. तसेच श्री महाबळेश्र्वरची अभिषेक पूजा केली.

# टाकळीवाडी मध्ये गौतम बुद्ध जयंती मोठ्या उत्साह मध्ये संपन्न



**पत्रकार नामदेव निर्मळे**

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे बौद्ध विहार मध्ये समस्त समाजाच्या वतीने मोठ्या उत्साहाने गौतम बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार गोरख निर्मळे यांच्या हस्ते अर्पण करण्यात आला. व मेणबत्ती प्रज्वलन व गौतम बुद्ध यांना पुष्प अर्पण ऑनरी कॅप्टन रमेश निर्मळे यांच्या हस्ते करण्यात आला.

प्रत्येक पौर्णिमेला व प्रत्येक महिन्याच्या रविवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व गौतम बुद्ध यांना मानवंदना तसेच प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात येते. प्रत्येक पौर्णिमेला महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. सन २०२३ गौतम बुद्ध जयंती पासून प्रत्येक रविवारी व प्रत्येक पौर्णिमेला बुद्ध वंदना अखंडपणे चालू आहे. समाजाच्या तळागाळापर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पोहोचवण्याचे श्रेय प्रत्येक तरुण पिढीने हाती घेतलेले आहे . डॉ. बाबासाहेब आंबेडकर व गौतम बुद्ध यांचे विचार प्रत्येक समाजापर्यंत पोहोचवण्याचे कार्य माजी सुभेदार तसेच महात्मा गांधी तंटामुक्त अध्यक्ष केंदबा कांबळे तसेच माजी सरपंच बाबासाहेब वनकोरे,सामाजिक कार्यकर्ते अनिल कांबळे, विनायक कांबळे, तसेच माजी सैनिक नंदकुमार कांबळे, पोस्ट मास्तर दिनकर माळगे, विश्र्वास कांबळे, खंडू कांबळे, राजकुमार कांबळे, सामाजिक कार्यकर्ते महेश कांबळे, सुनील कांबळे, अमोल माळगे, रमेश कृष्णा कांबळे, विलास बळे, बळीराज माळगे, अतिशय उत्साहाने व जोमाने करत असतात. पूर्ण तरुण पिढी यामध्ये अतिशय उत्साहाने सहभागी होतात. त्याला साथ सुद्धा प्रत्येक समाज बांधव देत आहे.

# यात्रेत येणाऱ्या भाविकांसाठी थंड पिण्याच्या पाण्याची सोय

## भोसे येथे समाजसेवक हनुमंत मोरे यांचा स्तुत्य उपक्रम




**पंढरपूर/प्रतिनिधी**

पाऊस पडण्यास सुरुवात झाली असली तरी पारा अजूनही खाली येण्याची नाव घेत नाही उन्हात नागरिकांचे तगमग थांबलेली नाही अशातच भोसे येथील श्री जानुबाई देवीची यात्रा शुक्रवारी पार पडत आहे भर उन्हात

नागरिकांच्या घशाची कोरड थांबण्यासाठी थंडगार पिण्याची पाणी असेल तर. हो भोसे येथील यात्रेत समाजसेवक हनुमंत मोरे, यांनी थंड पिण्याची पाण्याची सोय उपलब्ध करून दिले आहे या थंडगार पानपोळीचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पश्र्चिम महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष मा राजेंद्र कोरके पाटील यांच्या शुभहस्ते गुरुवारी पार पडले यावेळी समाजसेवक हनुमंत मोरे यांच्यासह बोरसे परिसरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते

पंढरपूर तालुक्यातील भोसे गावाचे ग्रामदैवत श्री जानुबाई देवीची यात्रा २३ २४ २५ हे तीन दिवस रोजी पार पाडत आहे या यात्रेस लाखो भाविक उपस्थित लावत असतात भर उन्हाळ्यात असणाऱ्या या या यात्रेस दरवर्षी शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय केली जाते समाजसेवक हनुमंत मोरे हे हा उपक्रम दरवर्षीच राबवत असतात यावर्षी थंडगार शुद्ध पिण्याच्या पाण्याची पानपोळीचे उद्घाटन मोठ्या थाटामाटात पार पडले या प्रसंगी सुनील आडगळे गुरुजी हरिचंद्र तळेकर विलास जमदाडे बाळासाहेब थिटे राजेंद्र गायकवाड दिलीप कोरके नितीन व्यवहारे अशोक जमदाडे बाळासाहेब जाधव संजय थिटे किरण आडगळी नवनाथ कोरके शिकारी दाजी सचिन कोरके भैया जामदाडे अशोक अवताडे पिंटू आडगळे हनुमंत कोळी व ज्येष्ठ पत्रकार अविनाश साळुंखे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते

**हनुमंत मोरे अनेक वर्षापासून समाजसेवक म्हणून कार्यरत आहेत मागील काही दिवसापूर्वीच त्यांनी काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी राजीनामा दिल्याने ते चर्चेत आले होते**

# स्टार प्रवाहच्या येड लागलं प्रेमाचं मालिकेत अतिशा नाईक साकारणार खलनायिका



२७ मे पासून स्टार प्रवाहवर सुरु होतेय नवी मालिका येड लागलं प्रेमाचं. पंढरपुरच्या मातीत रंगलेली रांगडी प्रेम कहाणी अभुनवण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. उत्कंठावर्धक कथानकासोबतच दिग्गज कलाकारांची फौज या मालिकेची आणखी एक जमेची बाजू. सुप्रसिद्ध अभिनेत्री अतिशा नाईक या मालिकेतून खलनायिकेच्या रुपात भेटीला येतील. शशीकला असं त्यांच्या व्यक्तिरेखेचं नाव असून कोणाचही भलं झालेलं तिला आवडत नाही. प्रत्येकाबद्दलच तिच्या मनात एक असूया आहे. अभिनेत्री होण्याचं शशीकलाचं स्वप्न होतं. मात्र हे स्वप्न अधुरच राहिलं. त्यामुळे नटण्याची तिला प्रचंड आवड आहे.

स्वार्थी, अप्पलपोटी आणि पैशांचा माज दाखवणारी अशी ही शशीकला साकारताना अभिनेत्री म्हणून कस लागत आहे अशी भावना अतिशा नाईक यांनी व्यक्त केली. या भूमिकेबद्दल सांगताना त्या म्हणाल्या, मी आजवर अनेक खलनायिका साकारल्या. मात्र शशीकलाची बातच न्यारी आहे. तिची घरात प्रचंड दहशत आहे. तिच्या पेहरावातून, चालण्यातून, बोलण्यातून याची कल्पना येते. मला खात्री आहे शशीकलाचा अंदाज प्रेक्षकांना नक्कीच भावेल. शशीकलाच्या दागिन्यांची, तिच्या साड्यांची नक्कीच चर्चा रंगेल.

शशीकलाचा मालिकेतली मुख्य नायिका म्हणजेच मंजिरीवर विशेष राग आहे. मंजिरी या घरात नसती तर एव्हाना शशीकलाने संपूर्ण घर आपल्या नावावर करुन घेतलं असतं. मंजिरीच्या सुरळीत होणाऱ्या गोष्टींमधे अडचणी आणून त्या कुटुंबाची कोंडी करायची हे काम शशीकला नेटानं करत असते. शशीकलाचे डाव यशस्वी होतात का हे पहायचं असेल तर नक्की पहा आमची नवी मालिका येड लागलं प्रेमाचं २७ मे पासून रात्री १० वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८

# कुगाव ते कळाशी दरम्यान उजनी धरणामध्ये बुडालेल्या सहा मृतदेहांवर, अखेर ४० तासांच्या शोधकाऱ्यानंतर अंत्यसंस्कार पुर्ण

करमाळा/प्रतिनिधीःकुगाव ते कळाशी दरम्यान बोटीमधून प्रवास करणाऱ्या एकूण सात व्यक्तींपैकी सहा व्यक्ती मृत झाल्याची माहिती सुरुवातीपासून मिळत होती. यातील एक पोलीस अधिकारी असलेला व्यक्ती पाण्यावर पोहत किनाऱ्यावर आल्यामुळे त्याचे प्राण वाचले. परंतु सहा मृत व्यक्तींचे मृतदेह NDRF पथकाच्या अथक शोधमोहिमे नंतर सुद्धा मिळून येत नव्हते. त्यामुळे दि. २२ मे रोजी सायंकाळी ५ वा. दरम्यान शोधकार्य सुरु असताना, अचानक परत एकदा सोसाट्याचा वारा सुटल्यामुळे, शोधकार्य थांबविण्यात आले. दि. २३ मे रोजी सकाळी गोकुळ दत्तात्रय जाधव (वय-३० वर्ष), कोमल गोकुळ जाधव (वय- २५ वर्ष), समर्थ गोकुळ जाधव (वय- दिड वर्ष), वैभवी गोकुळ जाधव (वय-३ वर्ष) हे सर्व राहणार झरे ता. करमाळा तर अनुराग अवघडे (वय- ३५ वर्ष) व गौरव डोंगरे (वय- २४ वर्ष) दोघे रा. कुगाव असे मृत झालेल्या व्यक्तींना अखेर



एकाच कुटुंबातील चार व्यक्ती एकाच वेळी मृत पावणे, ही झरे गावातील पहिलीच घटना आहे. तरी ज्या बोटी उजनी धरणावर नागरिकांची ने-आण करतात. त्यांचे परवाने आहेत का? त्यांच्याकडे पुरेशा सुविधा उपलब्ध आहेत का? या सर्व बाबी प्रशासनाने तपासुन पुढील अनर्थ टाळण्यासाठी वेळीच योग्य ती खबरदारी घ्यावी. त्याचप्रमाणे शासनाने प्रत्येक मृत व्यक्तीचे पाच-पाच लाख रुपये प्रमाणे जाधव कुटुंबियांना द्यावे. व आर्थिक सहाय्य करावे.**सोमनाथ घाडगे- झरे ग्रामपंचायत सदस्य**

NDRF च्या ४० तासांच्या अथक प्रयत्नांनी शोधण्यात यश आले. यातील पाच जणांचे मृतदेह २३ मे रोजी सकाळी पाण्यावर तरंगताना आढळून आले. यानंतर सदरील पाच मृतदेह करमाळा उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले. यातील गौरव डोंगरे याचा मृतदेह मिळण्यास उशीर झाला होता.

यानंतर सर्व मृतदेहांचे शवविच्छेदन करुन, मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. यातील दोन मृतदेहांवर कुगाव येथे तर चार मृतदेहांवर झरे येथे साश्रुनयनांनी नातेवाईक तसेच संपुर्ण झरे ग्रामस्थांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

जाधव कुटुंबातील चार मृतदेह त्यांच्या गावी झरे येथे घेऊन गेल्यानंतर, सर्व नातेवाईकांनी एकच आक्रोश करण्यास सुरुवात केली. या आक्रोशामध्ये गावातील ग्रामस्थ देखील त्यांचे अश्रु आवरु शकले नाही. जाधव कुटुंबातील चार ही मृतदेहावर एकत्रच अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात गर्दी करत साश्रुनयनांनी निरोप दिला.

# ३४ टक्के वाढीचा फरक व कमिशन डिपॉझीट रक्कम तोडणी वाहतूकदारांच्या खात्यात जमा

## फरक व कमिशन डिपॉझीट देणारा राज्यातील एकमेव कारखाना : आ.बबनराव शिंदे



माढा/प्रतिनिधी विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याने युनिट नं.१पिंपळनेर व युनिट नं.२ करकंब येथील ऊस गाळप हंगाम २०२३-२४ मधील ऊस तोडणी वाहतूक ठेकेदारांना ३४ टक्के वाढीचा फरक व कमिशन डिपॉझिट सह ७९ कोटी रक्कम वाहतूक ठेकेदार/मुकादम यांच्या बँक खात्यात जमा करणेत आली असल्याची माहीती संस्थापक चेअरमन आ.बबनराव शिंदे यांनी दिली.

अधिक माहीती देताना आ.शिंदे म्हणाले की, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे सन २०२३-२४ गळीत हंगामामध्ये युनिट नं.१ कडे १८ लाख ९२ हजार ९४९ मे.टन ऊसाचे गाळप होवून ११ टक्के साखर उतारा-याने १९ लाख २८ हजार ८५० क्विंटल साखर पोती उत्पादीत झाली आहेत. तसेच युनिट नं.२ कडे ६ लाख २५ हजार ८८८ मे.टन ऊसाचे गाळप होवून ११.१४ टक्के साखर उतारा-याने ६ लाख ६३ हजार ९०० क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन झालेले आहे. दोन्ही युनिट चे मिळून २५ लाख १८ हजार ८३७ मे.टन गाळप होवून २५ लाख ९२ हजार ७५० क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन झाले आहे. या हंगामात दोन्ही युनिट कडे गाळपास आलेल्या ऊसास हंगामाचे सुरूवातीपासून १० दिवसाला ऊस बिलाचे पेमेंट अदा केलेले आहे. या हंगामात गाळपास आलेल्या ऊसास पहिला ॲडव्हान्स प्रति मे.टन रू.२७००/- प्रमाणे अदा करण्यात आला असून या हंगामात १६ ते ३१ जानेवारी प्रति टन रू.५०/- १ ते २८ फेब्रुवारी प्रति टन रू.१००/- व १ मार्च,२०२४ पासून हंगाम अखेर पर्यंत प्रति टन रू.१५०/- याप्रमाणे उत्तेजनार्थ अनुदान अदा करणेत आलेले आहे. कारखान्याने या हंगामात ऊस बिलापोटी रू.६९३ कोटी ८६ लाख अदा केलेले आहेत.

या हंगामामध्ये दोन्ही युनिट कडे तोडणी वाहतूक करणा-या ट्रक/ट्रॅक्टर,ट्रॅक्टरगाडी व बैलगाडी मुकादम यांना साखरसंघ स्तरावर झालेल्या सामंजस्य करारानुसार तोडणी कमिशनमध्ये १ टक्का वाढ करून २० टक्के केलेले आहे. त्यानुसार कारखान्याने नुकताच ३४ टक्के वाढीव दरानुसार तोडणी वाहतूक बिले तयार करून वाढीच्या फरकाची एकूण ३६.०४ कोटी रक्कम ठेकेदारांना अदा केलेली आहे. तसेच कमिशन डिपॉझिट एकूण ४२.९६ कोटी अशी एकूण ७९ कोटी रक्कम तोडणी वाहतूक ठेकेदार/मुकादम यांचे बँक खात्यात वर्ग करण्यात आलेली आहे. तसेच या हंगामात बिगर ॲडव्हान्स तोडवाहतूक करणा-या ठेकेदार/मुकादम यांना वाढीव कमिशन ची होणारी ५ कोटी रक्कम येत्या आठ दिवसात अदा करणेत येईल. फरक व कमिशन डिपॉझीट अदा करणारा विठ्ठलराव शिंदे कारखाना राज्यातील एकमेव कारखाना ठरला आहे. कारखान्याने ऊस तोडणी वाहतूक बिलापोटी एकूण २१५ कोटी २४ लाख अदा केलेले आहेत. ऊस बिल व तोडणी वाहतूक बिलासह एकूण ९०९ कोटी १० लाख अदा केलेले आहेत.

पुढील सन २०२४-२५ गळीत हंगामासाठी दोन्ही युनिटकडे गाळप क्षमतेएवढा ऊस पुरवठा होणेसाठी ऊस तोडणी वाहतूक यंत्रणेचे करार सुरू करणेत आले असून ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार व मुकादम यांनी कारखान्याचे शेती विभागाशी संपर्क करून करार करावेत. तसेच ऊस तोडणी वाहतूक यंत्रणेस कारखाना धोरणानुसार लवकरच ॲडव्हान्स वाटप करणेची कार्यवाही होणार आहे. तसेच पुढील हंगाम यशस्वीरित्या पार पाडणेसाठी सभासद व ऊस पुरवठादार शेतक-यांनी जास्तीत जास्त ऊस नोंदी कारखान्याकडे देवून हंगाम यशस्वी करणेसाठी सहकार्य करावे असे आवाहन आ.शिंदे यांनी केले. सदरप्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन वामनराव उबाळे,कार्यकारी संचालक व इतर खातेप्रमुख उपस्थित होते.

# एसटीकडून १४१ दिवसांत काढली १२.९३ लाख ऑनलाइन तिकिट

सोलापूर/प्रतिनिधीः राज्य मार्ग परिवहन महामंडळाने १ जानेवारी २०२४ पासून ऑनलाइन आरक्षण प्रणाली अद्ययावत करून नव्याने सुरु करण्यात आलेल्या तिकीट आरक्षण प्रणालीला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. गेल्या १४१ दिवसांत प्रवाशांनी १२ लाख ९३ हजार ऑनलाइन तिकिटे काढल्याची माहिती महामंडळाचे जनसंपर्क अधिकारी अभिजित भोसले यांनी दिली. १ जानेवारी ते २० मेपर्यंत १२ लाख ९२ हजार इतक्या तिकिटाची विक्री या नव्या ऑनलाइन आरक्षण प्रणालीच्या माध्यमातून झाली आहे. याच काळात मागील वर्षी ९ लाख ७५ हजार तिकिटांची विक्री झाली होती. मागील वर्षाच्या तुलनेत ही संख्या सुमारे ३ लाखांनी जास्त आहे. सध्या या ऑनलाइन आरक्षण प्रणालीद्वारे दररोज १० हजार तिकिटे काढली जात आहेत. प्रवाशांना घरबसल्या एसटीचे तिकीट उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने एसटीने आपल्या npublic.msrtcors.com या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन तिकीट आरक्षण करण्याची सोय केली आहे. तसेच मोबाइलवर MSRTC Bus Reservation ॲपच्या माध्यमातूनही प्रवाशांना तिकीट काढता येते. या दोन्ही पध्दतीद्वारे तिकीट काढण्याच्या प्रणालीमध्ये १ जानेवारी २०२४ पासून आमूलाग्र बदल करुन त्या अद्ययावत करण्यात आल्या. परिणामी त्यातील अनेक दोषांचे निर्मूलन झाल्याने सदर ऑनलाइन आरक्षण प्रणाली प्रवाशांना वापरण्यास अत्यंत सोपी व सुलभ झाली आहे. तसेच या दोन्ही प्रणालीद्वारे प्रवाशांना अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला सन्मान योजना, दिव्यांग व्यक्ती अशा विविध सवलतींचे आगाऊ आरक्षण मिळू शकते. त्यासाठी महामंडळाने npublic.msrtcors.com या अधिकृत संकेतस्थळाबरोबरच MSRTC Bus Reservation ॲपच्या वापर प्रवाशांनी करावा असे आवाहन केले आहे.

तथापी, ऑनलाइन आरक्षण करताना प्रवाशांना तांत्रिक अडचण आल्यास ७७३८०८७१०३ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. सदर नंबर प्रवाशांना तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी २४ तास सुरु असणार आहे. तसेच ऑनलाइन आरक्षण करताना पैसे भरुनही तिकिटे न येणे (पेमेंट गेट वे संदर्भात) या तक्रारींसाठी ०१२०-४४५६४५६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन महामंडळाचे जनसंपर्क अधिकारी अभिजित भोसले यांनी केले आहे.

# पंढरपूर तालुक्यातील शेतीचे पंचनामे करुन नुकसान भरपाई द्यावी

## माजी आमदार प्रशांत परिचारक यांची मागणी



पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील शेतीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी प्रशासनाकडे केली आहे. दुष्काळजन्य परिस्थीतीला तोंड देत असलेल्या पंढरपूर तालुक्यात गेली दोन दिवसापासून अनेक गावांना अवकाळी पावसाचा व वादळी वाऱ्याचा मोठा फटका बसला आहे.

या पावसामुळे केळी, डाळींब, आंबा आदी फळबागांचे व शेतकऱ्यांच्या घराचे, लाईट पोलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अगोदरच दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यातच पंढरपूर तालुक्यातील शेतकरी आपली पिके जगविण्यासाठी संघर्ष करीत होते. मात्र बुधवारी पंढरपूर तालुक्यातील नांदोरे, नेमतवाडी, पेहे, शेवते आदी गावात वादळी वाऱ्यासह पावसाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. झालेल्या पाऊसामुळे व वादळी वाऱ्याने शेतकऱ्यांना नामोहरम केले असून शेतीचे, फळबागांचे व घराचे नुकसान झाले आहे. अतोनात मागील काही दिवसापासून प्रतिकुल हवामानामुळे पिकांचे बाजारभाव घसरले आहेत. बाजारपेठेतील व्यापारी फिरकत नसल्याने बळीराजावर दुहेरी संकट ओढवले गेले, त्यातच केळी बाग चांगल्या बहरल्या असताना अवकाळी पाऊस झाल्याने शेतकरी हवालदिल झालेला आहे. दरम्यान, प्रशांत परिचारक यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून झालेल्या नुकसानाची माहिती घेतली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. वादळी वाऱ्यांसह अवकाळी पावसाचा मोठा फटका बसून अनेक शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

तरी या पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्याला शासनाकडून आर्थिक मदत मिळवून देण्यात यावी अशी मागणी प्रशांत परिचारक यांनी प्रशासनाकडे केली. यामुळे शेतकऱ्यामध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# अभिजीत पाटील यांच्या मागणीची सरकारने घेतली दाखल

## भीमा नदीकाठचा वीज पूरवठा पूर्ववत सुरू



पंढरपूर/प्रतिनिधी : विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी भाजपला पाठिंबा दिला होता. केवळ शेतकऱ्यांच्या हितासाठी आपण तो पाठिंबा दिला असल्याचे जाहीर केले होते. सध्या दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याची भीषण टंचाई आहे. यामुळे पिण्याचे पाणी सह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला होता. ही बाब चेअरमन अभिजीत पाटील यांच्या लक्षात आली होती.

सोलापूर शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भीमा नदीतून पाणी सोडले आहे. त्यामुळे भीमा नदीकाठचा वीज पुरवठा केवळ दोन तास होता. मात्र हे पाणी नदीत असूनही याचा शेतकऱ्यांना फायदा नव्हता. त्यामुळे ही बाब अभिजीत पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर लेखी निवेदनाद्वारे मांडली होती. या निवेदनाची तात्काळ दखल घेत संबधित अधिकारी यांना सुचना दिल्या होत्या त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी गुरुवारी २३ मे रोजी होऊन जिल्हाधिकारी यांनी भीमा नदीकाठचा वीज पुरवठा पूर्ववत आठ करण्याबाबत वीज वितरण विभागाचे सोलापूर अधीक्षक अभियंता लेखी आदेश काढले असून वीज पुरवठा सुरू झाला आहे.

वरील आदेश मिळाल्याने शेतकऱ्यांमधून मोठ समाधान व्यक्त करण्यात येत आहे. विठ्ठलचे चेअरमन अभिजीत पाटील यांचा शब्द उपमुख्यमंत्री यांनी तत्काळ पूर्ण केल्याचेही अभिजीत पाटील समर्थक यांचेमधून मोठ आनंद व्यक्त करण्यात येत आहे. अभिजीत पाटील हे नेहमीच विविध समस्यावर मात करण्यासाठी झटणारे नेते म्हणून परिचित झाले आहेत. आता तर सत्ताधारी भाजपला त्याची साथ असल्याने यापुढेही त्यांच्या शब्दाला मोठ वजन प्राप्त होणार आहे. यामुळे आता अनेक समस्या शासन दरबारी मांडणारा खमका नेता या पंढरपूर, मंगलवेळ, माढा सह विविध भागाला मिळाला असल्याचे बोलले जात आहे.

# कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाला मदतीसाठी सहकार्य करु : राज्यपाल रमेश बैस



सातारा/प्रतिनिधीः कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाला आवश्यक मदतीसाठी शासनाकडे परिपूर्ण प्रस्ताव पाठविण्यात यावा. त्याची प्रत राज्यपाल कार्यालयास पाठवावी. शासनाकडून निधी उपलब्धतेसाठी आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, असे राज्यपाल रमेश बैस यांनी सांगितले.या विद्यापीठाच्या कामकाज, अडीअडचणीबाबत महाबळेश्वर येथील राजभवनात राज्यपाल श्री. बैस यांनी आढावा घेतला. यावेळी राज्यपालांच्या सहसचिव श्वेता सिंघल, विद्यापिठाचे कुलाधिकारी चंद्रकांत दळवी, कुलगुरु डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विजय कुंभार, उपसचिव रविंद्र धुरजड आदी उपस्थित होते.

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाची (समूह विद्यापीठ) स्थापना ऑक्टोबर २०२१ मध्ये झाली आहे. रयत शिक्षण संस्था ही देशातील अत्यंत जुनी व मोठी शिक्षण संस्था आहे. या संस्थेअंतर्गत सुमारे साडेचार लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या संस्थेच्या समूह विद्यापीठाला शासनाने मंजुरी दिली असून समूह विद्यापीठाला मंजुरी देत असताना शासनाचे जे धोरण होते त्या प्रमाणे आवश्यक ती सर्व मदत शासनाकडून उपलब्ध व्हावी, अशी मागणी विद्यापीठाच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी केली.यावेळी राज्यपालांनी विद्यापीठामार्फत चालविण्यात येत असणाऱ्या करिअर संबंधित उपक्रम, स्किल ओरिएंटेड उपक्रम, त्यातून विद्यार्थ्यांसाठी निर्माण होत असलेला रोजगार, नोकऱ्या यांचाही आढावा घेतला. रयत शिक्षण संस्थेमार्फत बेळगावमध्ये चालविण्यात येत असणाऱ्या शाळांबद्दलही राज्यपाल श्री. बैस यांनी जाणून घेतले.

# माढा शहरातील विकासकामांसाठी सव्वाचार कोटी रु.मंजूर



माढा/प्रतिनिधीः नगराध्यक्षा ॲड. मीनल साठे यांच्या प्रयत्नाने वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत माढा शहरातील विकासकामांकरिता ४ कोटी २५ लाख २८ हजार रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. सर्व विकासकामांचे भूमिपूजन दादासाहेब साठे, नगराध्यक्षा ॲड. मीनल साठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे यांच्या हस्ते करण्यात आले. माढा नगरपंचायत हद्दीतील वार्ड क्रमांक १- शिवाजी माने घर ते साठे वस्ती रस्ता डांबरीकरण करणे ९ लाख ९६ हजार रुपये, वार्ड १६ - सुनील लंकेश्वर घर ते विलास माने घर इनलाइन व रस्ता करणे ९ लाख ८९ हजार ७, वार्ड ११- विठ्ठल मंदिर येथे कंपाउंड वॉल पेव्हिंग ब्लॉक तसेच मंदिर परिसरात आवश्यक त्या सोयी सुविधा करून परिसर सुशोभीकरण करणे, वार्ड १२ - चिंचोली रस्ता ते सुरेश चवरे वस्ती दिनकर चवरे वस्ती रस्ता मजबुतीकरण करणे २४ लाख ९२ हजार, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते मनकर्णा ओढा गटार करणे रक्कम १ कोटी ४९ लाख ८६ हजार रूपये,

वार्ड - १७ मधील जगदाळे मंगल कार्यालय ते जुना वाकाव रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे रक्कम ४९ लाख ९० हजार ७०७ रुपये, वार्ड एक शहाणे वस्ती ते माढा-निमगाव रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे रक्कम १ कोटी, ७८ हजार, वार्ड - १६ मध्ये सुनील लंकेश्वर ते संतोष लुणावत यांच्या घरापर्यंत कॉंक्रिट रोड करणे रक्कम ४९ लाख ९३ हजार, वार्ड १२ मध्ये संत सेना महाराज मंदिर संरक्षण भिंत बांधणे रक्कम १० लाख,

वार्ड - १७ सन्मती नगर येथील ओपन स्पेस गणपती मंदिर परिसर सुशोभीकरण करणे रक्कम १० लाख, वार्ड - १० शिकलकर गल्ली येथे नवीन पाण्याचा हौद बांधणे रक्कम १० लाख रुपये या सर्व विकासकामांचे भूमिपूजन पार पडले.

यावेळी सभापती विकास साठे, अरुण कदम, नितीन नाना साठे, नगरसेविका शबाना बागवान, निर्मला थोरात, मोहिनी नेटके, वंदना लंकेश्वर, नगरसेवक आजिनाथ माळी, नितीन साठे, रमेश शहाणे, भागवत टिंगरे, रवींद्र कथले, अमोल नेटके, रमेश थोरात, मुन्ना बागवान, गणेश टिंगरे, महेश नेटके, विजय माने, अरुण मोरे, संतोष वाघमारे, संतोष मोरे आदी उपस्थित होते.